

सोलापूर : सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा कार्यक्रमात बोलताना मान्यवर

# ‘वसुंधरा’त ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’

**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल, क्विक हिल फाऊंडेशन, पुणे आणि वसुंधरा कला महाविद्यालय यांच्या वतीने ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’ हा उपक्रम राबविला. यामध्ये संगणकशास्त्र संकुलातील राहुल शिंदे, मोहिनी दुधाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी १५० विद्यार्थी उपस्थित होते. प्र. प्राचार्य डॉ. तानाजी देशमुख, उपप्राचार्या डॉ. अनुराधा क्षीरसागर, प्रा. ए. ए. मुल्ला, प्रा. आसमा शेख, प्रा. मेघा ढाणके उपस्थित होते. सूत्रसंचालन योगेश शिंदे यांनी केले. आभार सायली उबाळे यांनी मानले.